# Agri Stack

# MAHARASHTRA

Agri Stack MAHARASHTRA

# ॲग्रीस्टॅक काय आहे?

शेतकऱ्याची व त्याच्या शेत जमिनीची ओळख पटविणार

या माहितीच्या माध्यमातून

शेतकरी कर्ज वितरण सुलभता

कृषी योजनांची कार्याक्षाम्तापूर्ण अंमलबजावणी

शेतकऱ्याने पेरलेल्या पीकाचे नाव आणी क्षेत्र निश्चित करणार




ॲग्रीस्टॅक द्वारे कृषी कामकाज संघटीत झाल्याने सर्व संबंधित यंत्रणा जसे शेतकरी, ग्राहक, विक्रेते, यांना, आवश्यक माहीती अचूक वेळेवर व पारदर्शकरीत्या दिली जाईल

Agri Stack MAHARASHTRA

# ॲग्रीस्टॅक संकल्पना काय आहे?







**शेतकरी माहिती संच (Farmers’ Registry)**

शेतकऱ्याची आधारद्वारे ओळख पटविणार जमीन मालकी ७/१२ द्वारे निश्चित केली जाणार
या माहितीस शेतकऱ्याचा आधार क्रमांक जोडून त्यास अद्वितीय शेतकरी ओळख क्रमांक मिळणार (Farmer id)

**हंगामी पिकांचा माहिती संच(Seasonal Crops Registry)**

२०२१ पासून महाराष्ट्रात 'ई-पीक पहाणी' द्वारे माहीती गोळा केली जाते
रब्बी २०२४ पासून ई-पीक पहाणी(DCS) डिजिटल क्रॉप सर्वे ॲप लागू झाले आहे.
यामध्ये पिकांचा फोटो आणि जिओ फेन्सिंग अनिवार्य केल्याने पीकाचे सर्वेक्षण खात्रीशीर झाले आहे.
शेतीचे सर्व क्षेत्र सर्वेक्षण पूर्ण होण्यासाठी गावनिहाय सहाय्यक नेमणूक केल्या आहेत

**भूसंदर्भांकीत भूभाग असणारे गाव नकाशे यांचा माहिती संच (Geo- Referenced Land Parcel Cadastral Map)**

सर्वे क्रमांकाचे भु संदर्भिकरण (जिओ रेफरन्सिंग) भूमिअभिलेख विभागाकडे उपलब्ध

सध्या हा डेटा डिजिटल क्रॉप सर्वेसाठी वापरला जात आहे आणि तो भू-नकाशा (भारत सरकार) या संकेतस्थळावर उपलब्ध

# ई पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे (DCS) Pilot

**खरीप २०२३**
114 गावं, 93,532 ओनर्स प्लॉट समविष्ट, 65.11 % पीक पाहणी पूर्ण केली.

**रबी २०२३**
148 गावं, 84,452 ओनर्स प्लॉट समविष्ट, 98.56 % पीक पाहणी पूर्ण केली.

**उन्हाळी २०२४**
34 तालुका, २८५८ गावं, १ एप्रिल २०२४ पासून हंगाम सुरु करण्यात आला.

**खरीप २०२४**
34 जिल्हे, २८५८ गावं, हंगाम १ ऑगस्ट २०२४ पासून सुरु करण्यात आला.

**रब्बी २०२४**
४४३०० गावे, संपूर्ण राज्यात हंगाम १ डिसेंबर २०२४ पासून सुरु

# ई पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे (DCS) राज्यभर अंमलबजावणी

| महत्वाच्या बाबी |
|---|
| मोबाईल ॲप - शेतकरी,सहाय्यक, मंडळ आधिकारी लॉगीन |
| Geo Fencing गटाच्या हद्दीवर वर आधारित |
| 100 % पिक पाहणी पिकाच्या फोटोसह (पडीक जमिनीसह) |
| शेतकऱ्यांकडून न झालेली पिक पाहणी सहाय्यक यांच्यामार्फत |
| गटापासून कमाल ५० मीटर अंतराच्या आत पीक पाहणी |

# ई-पीक पाहणी (DCS) अंमलबजावणी रब्बी २०२४

Agri Stack MAHARASHTRA

- ई-पीक पाहणी (DCS) बाबत गावांमध्ये प्रचार व प्रसिद्धी बाबत नियोजन.
- रब्बी २०२४ हंगाम सुरु होण्या पूर्वी डिजिटल क्रॉप सर्वे साठी निवडलेल्या सहाय्यक यांचे आदेश संबंधित तहसीलदार यांचे कडून पारित झाल्याचे खात्री करणे.
  - सहाय्यक नियुक्ती:
    - राज्याचे ई-पीक पाहणी ॲप मध्ये शेतकरी स्तरावरील पीक पाहणीचा कालावधी संपल्यानंतर पीक पाहणी करणे
    - शेतकऱ्यांना पीक पाहणी करण्यास मदत करणे व शेतकरी स्तरावर ६०% पीक पाहणी पूर्ण होईल याची काळजी घेणे.
    - सहाय्यकाने मोबाईल ॲप द्वारे नोंदणी करणे आवश्यक
    - नोंदणी केलेल्या सहाय्यकास तलाठी द्वारे मान्यता देणे
    - कोतवाल, ग्राम रोजगार सेवक, आशा सेविका व ग्राम स्तरीय मानधनावर कार्यरत इतर विभागांचे कर्मचारी यांना सहायक म्हणून नेमणूक देता येईल.
    - प्रती पिकपाहाणी सहाय्यकास प्रती हंगाम रु५ इतके मानधन (शेतकरी स्तरावर पीक पहाणी ६०% पूर्ण केल्यास) लागू आहे.

# भूसंदर्भांकीत भूभाग असणारे गाव नकाशे यांची माहिती संच

- महाराष्ट्रातील ४३,७०० गावांमध्ये आतापर्यंत भु संदर्भिय नकाशे पूर्ण झाले आहेत
- सध्या हे नकाशे ई-पीक पहाणी (DCS) ॲप्लिकेशनमध्ये डिजिटल पीक सर्वेक्षण करण्यासाठी वापरले जात आहेत

# शेतकरी माहिती संच आवश्यकता

Agri Stack MAHARASHTRA

- शेतकऱ्यांना डिजिटल पीक कर्ज (kcc)
- पीक विमा
- PM किसान योजने अंतर्गत हप्ते मिळवण्यासाठी फार्मर id अनिवार्य
- Direct Benefits Transfer Scheme (DBT) साठी फार्मर आयडी चा उपयोग होईल
- सुधारित माहिती मिळणार: हवामान डेटा, मृदा आरोग्य माहिती, पिकांबद्दल सल्ला

# माहिती संच निर्मिती मध्ये आतापर्यंत झालेले कामकाज

Agri Stack MAHARASHTRA

- विविध कृषी योजनांच्या डेटावर, अधिकार अभिलेख डेटा वापरून, महाराष्ट्र राज्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याची गावातील जमीन एकत्रितरीत्या नोंदण्याची बकेटिंग प्रक्रिया पूर्ण झाली आहे
- कॅम्प मोडसाठी लागणारे मोबाइल ॲप्लिकेशन विकसित करण्याच्या प्रक्रियेत आहे
- कॅम्प मोड साठी क्षेत्रीय स्तरावर कामकाज करणारे वापरकर्ते (user) जसे तहसीलदार, ग्राम महसूल अधिकारी, ग्राम विकास अधिकारी/ कृषी सहय्यक यांचे नोंदणी व गावे जोडणी करावायचे module तयार असून त्यामध्ये पथक आदेशानुसार नोंदणी व गाव जोडणी करावयची आहे
- १५ नोव्हेंबर २०२४ रोजी माळेगाव तालुका मावळमध्ये एक पथदर्शी (प्रूफ ऑफ कॉन्सेप्ट) घेण्यात आली.
- २९ नोव्हेंबर २०२४ रोजी मुळशी तालुक्यातील भुगाव, भुकुम, पिरंगुट गावांमध्ये दुसरा पथदर्शी (प्रूफ ऑफ कॉन्सेप्ट) करण्यात आली.
- डिसेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात राज्यातील सर्व तालुक्यातील एका गावात पथदर्शी (प्रूफ ऑफ कॉन्सेप्ट) करणेबाबत सुचना दिल्या असून याबाबत क्षेत्रीय स्तरावरुन गावांची नावे प्राप्त झाली आहेत.

# शेतकरी नोंदणीसाठी विविध पद्धती

| Mode | Description |
|---|---|
| सेल्फ-मोड:- वेब पोर्टल द्वारे | • सेल्फ मोड वेब पोर्टल द्वारे शेतकरी स्वत: नोंदणी अर्ज दाखले करू शकतील : https://mhfr.agristack.gov.in/farmer-registry-mh/#/<br>• शेतकऱ्याने आधार पडताळणी करून, आपल्या शेत जमिनीचा तपशील नमूद करावा आणि त्यानंतर AgriStack कामकाजासाठी सहभागास आधार क्रमांक जोडणी करण्यास सहमती द्यावी.<br>• त्यानंतर मान्यतेसाठी ग्राम महसूल अधिकारी / तहसीलदार यांच्या लॉगीन मध्ये सदर नोंदणी अर्ज पाठविला जाईल<br>• मंजुरीनंतर शेतकऱ्यासाठी फार्मर आयडी तयार होईल |
| कॅम्प मोड:- वेब व मोबाईल | • ऑपरेटर मोडमध्ये तीन महत्वाचे टप्पे: आधार पडताळणी, जमीन निवडणे आणि सहमती देणे<br>• ओटीपीचा किंवा Face Authentication चा वापर करून तलाठी शेतकऱ्याचा आधार क्रमांक पडताळणी करेल आणि शेतकऱ्याची UIDAI कडुन प्राप्त वैयक्तिक माहीती तपासून आवश्यक तर दुरूस्त करेल.<br>• जमीन निवडणे प्रक्रियेत- ग्राम महसूल अधिकारी शेतकरी आणि त्याच्या शेत जमिनीची ओळख पटवेल अधिकार अभिलेख तपासून आवश्यक तर शेतकऱ्याच्या जमिनीच्या बकेटमधील जमिनी कमीजास्त करेल. यानंतर जमिन पडताळणी वर शिक्कामोर्तब होईल.<br>• कृषी सहाय्यक हे त्यांच्या लॉगीन मधून शेतकऱ्याची AgriStack अंतर्गत विवध योजनांचा लाभ घेण्यासाठी व अधिकार अभिलेखाशी आधार जोडण्यासाठी ई-स्वाक्षरीद्वारे संमती घेतील<br>• Name Match Score आधारे महसूल अधिकाऱ्याकडून किंवा ऑटो मंजुरीने मान्यता<br>• मंजुरीनंतर शेतकरी ओळख क्रमांक तयार करणेची प्रक्रिया system सुरु करेल व काही वेळेत शेतकरी आणि कृषी सहायक यांना शेतकरी ओळख क्रमांक URL sms द्वारे प्राप्त होईल. |


# शेतकरी माहीती संच (फार्मर रेजिस्ट्री) बनवण्याची प्रक्रीया- कॅम्प मोड

Agri Stack MAHARASHTRA

| शेतकऱ्याची ओळख | जमिनी निवडा | संमती आणि ई-स्वाक्षरी | मान्यता | फार्मर ID बनणे |
|---|---|---|---|---|
| आधार क्रमांक नमूद करून, फिंगरप्रिंट (केवळ पोर्टलवर उपलब्ध), ओटीपी किंवा फेशियल रिकग्निशन (मोबाइल) द्वारे पडताळणी. | शेतकऱ्याची बकेट मधील जमीन पडताळणी करुन मालकीच्या जमिनी निवडा. | AgriStack अंतर्गत लाभ घेण्यासाठी व अधिकारअभिलेखाशी आधार जोडणी करण्यासाठी ई-स्वाक्षरीद्वारे संमती | Name Match Score नुसार महसूल अधिकाऱ्याकडून ऑटो मंजुरी किंवा मान्यता | अर्ज मंजूर झाल्यानंतर शेतकऱ्याची ID तयार केले जाईल |

# Name match score

- 'Name match score' आधार व अधिकार अभिलेखातील खातेदाराचे नाव जुळवून त्याची टक्केवारी दर्शवेल.
- 'Name match score' पडताळणीसाठी काही मर्यादा ठरविण्यात आले आहे.
- ०-२०% 'Name match score' साठी पहिल्या वेळेस ग्राम महसूल अधिकारी यांचे लॉगीन मध्ये उपलब्ध होईल व कारण नमूद करून ते पुढे मन्यतेसाठी तहसीलदार लॉगीन उपलब्ध होईल.
- २० ते ८०% 'Name match score' पडताळणीसाठी ते ग्राम महसूल अधिकारी यांच्या लॉगीन ला नाव जुळल्यास मान्यतेसाठी उपलब्ध असेल.



Agri Stack MAHARASHTRA

# शेतकरी माहिती संच निर्मितीसाठी आवश्यक ॲप

- सदर सर्व Applications हे सध्या Android मोबाईलवर चालू असल्याने आपला फोन Android असल्याची खात्री करावी व हे Applications डाऊनलोड करावी
- ग्राम महसूल अधिकारी यांनी कामकाजासाठी Farmers' Registry व Face RD या २ Android app ची आवशकता आहे
- कृषी सहाय्यक/ ग्राम सेवक यांना कामकाजासाठी Farmers' Registry, ई-हस्ताक्षर व Face RD या ३ Android app ची आवशकता आहे

Farmers' Registry MH

Face RD

E-hastakshar

**स्वयं नोंदणी संकेतस्थळ:** https://mhfr.agristack.gov.in/

# विभाग स्तरावरील कार्यवाही

- विभागीय पातळीवर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व कृषी सहसंचालक यांच्यासोबत प्रकल्प अंमलबजावणीसाठी बैठका आयोजित करणे.
- कृषी आयुक्त व जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त साहित्याचा प्रचार व प्रसार करून जिल्हास्तरावर वितरण करणे.
- मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी मास्टर ट्रेनर्सची नियुक्ती करून त्यांना परिपूर्ण प्रशिक्षण देणे.
- अधीनस्थ अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून पर्यवेक्षण करणे.
- विभागातील तीन पायाभूत माहिती संच निर्मिती मोहिमेचा नियमित आढावा घेणे व नियंत्रण ठेवणे.
- मोहिमेदरम्यान कॅम्पला अचानक भेटी देऊन कामाची प्रगती, गती व गुणवत्ता तपासून योग्य कार्यवाही करणे.
- दर आठवड्याला प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेऊन कमी काम असलेल्या जिल्ह्यांसाठी अतिरिक्त नियोजन करणे.
- प्रकल्पाबाबत विभागीय आढावा घेऊन प्रगती अहवाल व सूचनांसह शासनास माहिती पाठवणे.



# जिल्हा स्तरावरील कार्यवाही

- जिल्हास्तरीय प्रकल्प अंमलबजावणीसाठी मुख्य अधिकारी व महसूल अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करणे.
- मोहिमेसाठी मास्टर ट्रेनर्सची नियुक्ती करून त्यांना परिपूर्ण प्रशिक्षण देणे.
- संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम आखणी, प्रत्यक्ष प्रशिक्षण व साहित्य वाटप करणे.
- कृषी व जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून मिळालेल्या साहित्याचा प्रचार व जिल्हा स्तरावर वितरण करणे.
- पत्रकार परिषद घेऊन प्रकल्पाची व्यापक प्रसिद्धी करणे.
- शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांमार्फत व सार्वजनिक ठिकाणी लाउडस्पीकरद्वारे मौखिक प्रचार करणे.
- मुद्रित माध्यम (वृत्तपत्रे, फलक, पोस्टर) वापरून जनजागृती करणे व पत्रकारांशी संवाद साधणे.
- दृकश्राव्य माध्यम (जिंगल्स, व्हिडिओज, सोशल मीडिया) वापरून प्रकल्पाचे प्रबोधन करणे.



# जिल्हा स्तरावरील कार्यवाही

- प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी नियोजन करून उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांची सभा घेऊन गावांचा व मनुष्यबळाचा आढावा घेणे.
- अधिक खातेदार असलेल्या गावांसाठी जास्त पथकांची नेमणूक व कमी खातेदार असलेल्या गावांचा समूह करून एक पथक नेमणे.
- ग्राम महसूल अधिकारी व कृषी सहायक किंवा ग्रामविकास अधिकारी यांची आवश्यक पथके तयार करून पर्यवेक्षण करणे.
- तालुक्यांकडून प्राप्त कॅम्प निधी प्रस्तावांचा आढावा घेऊन शेतकरी संख्येनुसार निधी वितरित करणे.
- पायाभूत माहिती संच निर्मिती मोहिमेचा नियमित आढावा घेऊन नियोजन करणे.
- कमी काम होणाऱ्या तालुक्यांसाठी कामाचा वेग वाढविण्यासाठी अतिरिक्त नियोजन करणे.
- मोहिमेदरम्यान कॅम्पला अचानक भेट देऊन प्रगती, गती व गुणवत्तेची तपासणी करणे.
- प्रगती अहवाल व सूचना तयार करून विभागास पाठवणे.



# तालुका स्तरावरील कार्यवाही

- प्रकल्प अंमलबजावणीसाठी गट विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्या उपस्थितीत उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करणे.
- मोहिमेसाठी आवश्यक मास्टर ट्रेनर्स नियुक्त करून त्यांना परिपूर्ण प्रशिक्षण देणे.
- प्राप्त प्रशिक्षण साहित्याचा विनियोग करून अधिकची प्रशिक्षणे आयोजित करणे.
- ॲग्रीस्टॅक प्रकल्पाबाबत प्रचार व प्रसिद्धीसाठी विविध उपक्रम राबविणे.
- व्यापक प्रसिद्धीसाठी उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद आयोजित करणे.
- मौखिक प्रचारासाठी महाविद्यालय, कृषी विद्यापीठ व शाळांमधील विद्यार्थ्यांचे माध्यम वापरून जनजागृती करणे.
- बस स्थानके, रेल्वे स्थानके, बाजार समित्या व सार्वजनिक ठिकाणी लाउडस्पीकरद्वारे प्रचार करणे.
- मुद्रित माध्यमाद्वारे, स्थानिक वर्तमानपत्र, फलक व पोस्टरच्या माध्यमातून प्रकल्पाची माहिती देणे.




# तालुका स्तरावरील कार्यवाही

- गावातील शेतकऱ्यांच्या संख्येनुसार पथकांची संख्या निश्चित करणे.
- पथकासाठी ग्राम महसूल अधिकारी व ग्राम विकास अधिकारी/कृषी सहायक यांची नेमणूक तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी व गट विकास अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करणे.
- ग्राम महसूल अधिकाऱ्यांना खातेदार व जमीन ओळख पटवण्याची जबाबदारी देऊन, सजेच्या तलाठ्यांनाच पथकात समाविष्ट करणे.
- मोठ्या गावांमध्ये पूर्वी काम केलेल्या महसूल अधिकाऱ्यांना पथकात समाविष्ट करणे.
- मोहीम कालावधी मध्ये ग्राम महसूल अधिकारी व कृषी सहाय्यक / ग्राम विकास अधिकारी व त्यांचे गावांची संख्ये नुसार आठवडे निहाय कामकाजाचे नियोजन करणे.
- प्रत्येक आठवड्यातील मंगळवार, बुधवार व गुरुवार हे तीन दिवस पथके गावामध्ये मुक्कामी राहतील.
- मोठ्या गावांमध्ये जास्त पथकांची नेमणूक व कमी खातेदार असलेल्या गावांमध्ये गावांचा समूह करून एक पथक नेमणे.
- कॅम्प आयोजनासाठी लागणारा खर्च व शेतकरी संख्येनुसार अंदाज घेऊन मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे कळविणे.
- कॅम्पला अचानक भेट देऊन प्रगती, गती व गुणवत्तेसाठी आवश्यक कार्यवाही करणे.
- प्रकल्प व पथकांच्या कामकाजाचा नियमित आढावा घेऊन कमी प्रमाणात काम झालेल्या गावांसाठी अतिरिक्त नियोजन करणे.




# वापरकर्ता आयडी मॅपिंग – तहसीलदार यांच्यासाठी मार्गदर्शिका

# तहसीलदार – लॉगिन वेब पोर्टल मध्ये





- लॉगिन करण्यासाठी तहसीलदार यांनी Username प्रविष्ट करा
- त्यानंतर Password प्रविष्ट करा किंवा ओटीपी पर्याय निवडून नोंदणीकृत मोबाइल नंबरवर पाठवलेला ओटीपी प्रविष्ट करा.
- स्क्रीनवर दिसणारा Captcha प्रविष्ट करा आणि "लॉग इन" वर क्लिक करा.

# यूजर मॅनेजमेंट





- त्यानंतर स्क्रीनच्या डाव्या बाजूला असलेल्या " User Management" पर्यायावर क्लिक करा.
- ड्रॉपडाउन मधून " Territory Users" पर्याय निवडा.
- " Territory Users " वर क्लिक केल्यावर तुम्हाला ही स्क्रीन दिसेल.

# User role निवडा





- "User Role" ड्रॉपडाउनवर क्लिक करा.
- त्यानंतर “Talathi Revenue" हा पर्याय निवडावा

# User role निवडा





- तहसीलदार यांना खालील विंडोमध्ये वापरकर्त्यांची यादी दिसेल.
- तहसीलदार यांना त्यांच्या अधिकारक्षेत्रात असणारे वापरकर्तेच दिसतील.

# यूजर ला गावे नियुक्त करण्यासाठी प्रक्रिया





- ज्या वापरकर्त्यासाठी गाव नियुक्त किंवा काढायचे आहे तो वापरकर्ता निवडा.
- पेन्सिल चिन्ह म्हणून दर्शविलेला “Edit" पर्यायावर क्लिक करा.

# प्रोफाइल तपशील आणि गाव नियुक्ती





- "Edit" पर्यायावर क्लिक केल्यावर पॉप-अप उघडेल.
- या मध्ये वापरकर्ता नाव, ईमेल आणि मोबाइल क्रमांक भरा.
- पृष्ठाच्या उजव्या बाजूने ड्रॉपडाउन मधून नियुक्त करायचे गाव निवडा.

# वापरकर्ता तपशील उपडेट करा





- सर्व फील्ड भरल्यानंतर आणि गावे निवडल्यानंतर, माहिती जतन करण्यासाठी "Update" बटणावर क्लिक करा.

# मोबाइलवर टेक्स्ट संदेशाद्वारे पासवर्ड मिळविणे




- ग्राम महसूल अधिकारी यांना वापरकर्तानाव आणि पासवर्डसह एक संदेश प्राप्त होईल.
- प्रथमच लॉगिन करण्यासाठी वापरकर्त्याने हा पासवर्ड वापरावा आणि लॉगिन करताना पासवर्ड रीसेट करण्यास सांगितले जाईल.

# पासवर्ड बदलणे




- मोबाइलवर प्राप्त झालेला पासवर्ड पुन्हा प्रविष्ट करा.
- इच्छित पासवर्ड प्रविष्ट करा.
- “Create Password" वर क्लिक करा.
- स्क्रीन होम पेजवर पुनर्निर्देशित झाल्यावर नवीन पासवर्डने लॉगिन करा.

# कॅम्प कसा असावा?

१. गावाचे ग्राम विकास अधिकारी व कृषी सहाय्यक यांची कॅम्प आयोजन हि प्रमुख जबाबदारी आहे.
२. घरो घर जाऊन गावातील शेतकरी संख्या निश्चित करणे जेणे करून किमान तीनशे शेतकरी क्षमतेचे नियोजन करता येईल.
३. कॅम्प साठी जागा निश्चित करतांना गावातील सर्वाधिक इंटरनेट कनेक्टीविटी असणारी जागा निश्चित करण्यात यावी
४. भारतनेट प्रकल्प अंतर्गत सर्व ग्राम पंचायतींमध्ये इंटरनेट कनेक्टीविटी देण्याचे कामकाज करण्यात आले असून या उपलब्धतेचा विचार वरील कामकाजासाठी करण्यात यावा.
५. कॅम्पच्य जागी मुलभूत सुविधा जसे कि पिण्याचे पाणी, स्वच्छता, आवश्यक खुर्ची टेबल, प्रसिद्धी पत्रके, कॅम्प फलक आदी साधने व साहित्य उपलब्ध असावे.
६. कॅम्पच्या तारखा या गावामध्ये तसेच गावातील रहिवासी असणाऱ्या बाहेर गावच्या लोकांना कळणेसाठी त्याची पूर्व प्रसिद्धी (किमान आठ दिवस आधी) करण्यात यावी.
७. कॅम्प मधील लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी गावातील प्रतिष्ठित, प्रभावशाली व्यक्ती तसेच स्थानिक माध्यमांचा वापर करण्यात यावा.
८. कॅम्प दरम्यान ओळख पटविण्यासाठी आधार क्रमांकसोबत संबंधित व्यक्तीचा मोबाईल क्रमांक जोडला असल्यास प्रक्रिया सोपी होते हे विचारात घेऊन कॅम्प पूर्वी आधारला मोबाईल क्रमांक जोडण्याची मोहीम गावात घ्यावी.
९. कॅम्प साठी नेमलेल्या पथक कर्मचाऱ्यांनी कॅम्प पूर्वी एकत्र येऊन कॅम्प साठी करावयाच्या कामकाजाची आखणी / नियोजन प्रत्येक गावातील परिस्थिती पाहून करावे.



# प्रचार व प्रसिद्धीसाठी काय करावे?

१. गावाचे ग्राम विकास अधिकारी व कृषी सहाय्यक यांची प्रचार प्रसिद्धी हि दुसरी प्रमुख जबाबदारी आहे.
२. कॅम्पच्य जागी प्रसिद्धी  पत्रके, कॅम्प फलक लावणे साठी आवश्यक साहित्य जिल्हा स्तरावरून उपलब्ध करून घ्यावे.
३. कॅम्पच्या तारखा या गावामध्ये तसेच गावातील रहिवासी असणाऱ्या बाहेर गावच्या लोकांना कळणेसाठी त्याची पूर्व प्रसिद्धी (किमान आठ दिवस आधी) करण्यात यावी.
४. कॅम्प मधील लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी गावातील प्रतिष्ठित, प्रभावशाली व्यक्ती तसेच स्थानिक माध्यमांचा वापर करण्यात यावा.
५. घरो घर जाऊन गावातील शेतकरी संख्या निश्चित करणे व ते ज्या कृषी योजनांचा लाभ घेतात तो लाभ या पुढेही मिळण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक आवश्यक असल्याची जाणीव प्रत्यक्ष भेटून करून देणे.






# 1

## ग्राम महसूल अधिकारी लॉगिन

# लॉगिन

- पथकातील कर्मचारी नोंद व गावांची नोंदणी हे तहसीलदार स्तरावर करून पथकातील दोनही कर्मचारी यांना user id व  password देण्यात आला आहे
- मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये लॉगिन स्क्रीनवर ग्राम महसूल अधिकारी यांनी त्यांचे username व Password प्रविष्ट करून प्रवेश करावा.
- आपण आपला पासवर्ड विसरले असल्यास 'Forgot Password' या लिंकचा वापर करून पुन्हा तयार करता येईल.




Agri Stack MAHARASHTRA

# आधार पडताळणी व जमीन निवडणे


- शेतकरी उपस्तीत झाल्यावर सर्व प्रथम शेतकऱ्याची आधार पडताळणी व जमीन निवडण्यासाठी ‘Farmer e-KYC Land Addition’ हा पर्याय निवडावा.



# आधार पडताळणी


- येथे ग्राम महसूल अधिकारी याने शेतकऱ्याचा अचूक आधार क्रमांक प्रविष्ट करणे आवश्यक आहे.
- सबमिट बटनवर क्लिक केल्यावर, ओटीपी शेतकऱ्याच्या आधार क्रमांकाशी जोडलेल्या मोबाईल क्रमांकावर पाठवला जाईल.
- यासाठी शेतकऱ्याचा आधार क्रमांकाशी जोडलेला मोबाईल क्रमांक चालू स्थितीत आहे व सोबत आहे याची खात्री करावी

नोट: आधार पडताळणी करतेवेळीस ओटीपी येण्यास अडचण आल्यास पर्यायी मार्ग म्हणून “Face RD” हे ॲप्लिकेशन वापरून पडताळणी पूर्ण करता येईल



# मोबाइल आणि ईमेल


- आधार ची पडताळणी झाल्यानंतर या स्क्रीनवर निर्देशित केले जाईल
- येथे ग्राम महसूल अधिकारी यांनी शेतकऱ्याचा मोबाइल क्रमांक (शक्यतो आधार संलग्न) प्रविष्ट करावा
- मोबाइल क्रमांक प्रविष्ट केल्यानंतर शेतकऱ्याला मोबाईल क्रमांकावर पडताळणी साठी ओटीपी प्राप्त होईल
- ओटीपी प्रविष्ट करून मोबाईल क्रमांकाची पडताळणी पूर्ण करता येईल
- ईमेल आयडी प्रविष्ट करणे ऐच्छिक आहे. ईमेल आयडी प्रविष्ट केल्यानंतर शेतकऱ्याला ईमेल आयडीवर पडताळणी साठी ओटीपी प्राप्त होईल
- ओटीपी प्रविष्ट करून ईमेल आयडीची पडताळणी पूर्ण करता येईल




Agri Stack
MAHARASHTRA

# शेतकऱ्याची आधार संलग्न माहीती

- या स्क्रीनवर ग्राम महसूल अधिकारी UIDAI मध्ये नोंदविलेले शेतकऱ्याचे नाव व माहिती पाहू शकतात.
- आधार नुसार 'Identifier name' (ओळखकर्ता नाव) हे वडिलांचे किंवा पतीचे नाव असू शकते.
- नेम मॅच स्कोअर हे शेतकऱ्याच्या नावाची इंग्रजी आणि स्थानिक भाषेतील साम्यता किती टक्के आहे हे दर्शविते.
- नेम मॅच स्कोअरची टक्केवारी कमी असेल, तर अधिकारी मराठीतील नाव सुधारून ते जुळवू शकतात.
- आधार डेटाबेस समधून हे तपशील आपोआप भरले जातात. कोणतीही माहिती नसल्यास, ग्राम महसूल अधिकारी आवश्यक असेल तर ती स्वतः भरू शकतात




Agri Stack MAHARASHTRA

# शेतकऱ्याचा रहिवासी तपशील


- या स्क्रीनवर शेतकऱ्याचा राहता पत्ता दाखवला जातो.
- ग्राम महसूल अधिकारी शेतकऱ्याची उर्वरित कोणतीही माहिती पूर्ण करू शकतात.
- सदर माहिती मधील पत्ता हा UIDAI मध्ये नोंदविला असून हि माहिती संबंधिताचा निवासी पत्ता म्हणून साठविला जाणार आहे.
- शेतकऱ्याचा राहता पत्ता आणि आधार वरील पत्ता वेगवेगळा असल्यास, ग्राम महसूल अधिकारी ‘Insert latest address’ पर्याय निवडू शकतो आणि नवीन पत्ता प्रविष्ट करू शकतात.




Agri Stack MAHARASHTRA

# भुधारणेचा प्रकार


- या स्क्रीनवर ‘Owner’ हा पर्याय दिसेल
- सदर स्क्रीन वर ग्राम महसूल अधिकारी यांनी केवळ ‘Next’ बटन वर क्लिक करायचे आहे




Agri Stack MAHARASHTRA

# व्यवसाय

- ग्राम महसूल अधिकारी यांनी या स्क्रीनवर काहीही न करता केवळ ‘Next’ बटन वर क्लिक करावे



# ग्राम महसूल अधिकारी यांना शेतकऱ्यांच्या शेत जमीनी पडताळणी साठी पाहणेची प्रक्रिया

**महत्वाचे:**

- ग्राम महसूल अधिकाऱ्याने शेतकऱ्याच्या जमिनी अधिकार अभिलेख तपासून त्या जोडणे आवश्यक आहे
- जमिनी फक्त तेव्हाच जोडल्या जाऊ शकतात जर त्या शेतकऱ्याच्या नावाने त्याच्या ७/१२ वर दर्शविल्या गेल्या असतील

'व्यवसाय' स्क्रीन च्या 'Next' बटनवर क्लिक केल्यावर जमिनी पाहण्याच्या स्क्रीनवर निर्देशित केले जाईल

1. आदर्शतः शेतकऱ्याच्या जमिनी, जमिनी पाहण्याच्या स्क्रीनवर **बकेटमधून** आपोआप भरल्या जातील
2. जर जमिनी भरल्या गेल्या नसतील तर शेतकऱ्याच्या कोणत्याही एका जमिनीचा सर्वे क्रमांक प्रविष्ट करून बकेटमधून उर्वरित जमिनी जोडल्या जातील.
3. ज्या प्रकरणात शेतकऱ्याची बकेट तयार नाही किंवा अद्ययावत नाही, तर त्याच्या जमिन/जमीनी ग्राम महसूल अधिकारी थेट अधिकार अभिलेख माहीती मधून जोडू शकतो

# जमीनी जोडण्याची पूर्ण प्रक्रिया

Agri Stack MAHARASHTRA

**जमीनी पाहणे व जोडण्याची प्रक्रिया**

### १

- शेतकऱ्याच्या जमिनीची बकेट आपोआप आली
- ग्राम महसूल अधिकारी सर्व जमीनी अधिकार अभिलेख सोबत पडताळणी करतील
- जमीनी कमी करण्यासाठी व अजून जमीनी वाढ करण्यास मुभा

### २व३

**शेतकऱ्याच्या जमिनीची बकेट आली नाही**

#### २


- बकेट अस्तित्वात आहे व ग्राम महसूल अधिकारी जोडू शकतात
- शेतकऱ्याचा १ सर्वे क्रमांक प्रविष्ट करून बकेट घ्यावी
- ग्राम महसूल अधिकारी आलेल्या जमीनी अधिकार अभिलेख सोबत पडताळणी करतील
- जमीनी कमी करण्यासाठी व अजून जमीनी वाढ करण्यास मुभा

#### ३

- शेतकऱ्याची बकेट तयार नाही
- ग्राम महसूल अधिकारी शेतकऱ्याची जमीन अधिकार अभिलेख मधून जोडू शकतात
- ग्राम महसूल अधिकारी सर्व जमीनी अधिकार अभिलेख सोबत पडताळणी करतील
- जमीनी कमी करण्यासाठी व अजून जमीनी वाढ करण्यास मुभा

# आदर्शत: शेतकऱ्याच्या जमिनी, जमिनी पाहण्याच्या स्क्रीनवर बकेटमधून आपोआप भरल्या जातील

- गावातील त्या शेतकऱ्याची जमिनीची माहिती दर्शवलेल्या स्क्रीन मध्ये दिसेल कारण शेतकऱ्यांच्या जमिनीची अधिकार अभिलेखातील माहीती आपल्या app वर bucketing प्रणाली द्वारे साठवण्यात आली आहे.
- सदर माहीती ही ग्राम महसूल अधिकारी हयांनी त्यांच्या कडील गाव दफ्तरी असणाऱ्या अधिकार अभिलेखा सोबत प्रथम पडताळणी करावी.
- ज्या जमीनी संबंधित शेतकऱ्यांच्या असूनही बकेट मध्ये त्याच्या नावाने नोंदविलेल्या नाहीत का याची तपासणी करावी
- ज्या जमीनी शेतकऱ्यांच्या नसूनही बकेट मध्ये त्याच्या नावाने नोंदविलेल्या आहेत का याची तपासणी करावी.





मागे

Agri Stack MAHARASHTRA

# सर्व जमीनींची पडताळणी


- एकदा सर्व जमिनींचा समावेश झाल्यानंतर ‘Verify all lands’ हा पर्याय निवडणे **आवश्यक** आहे.
- त्यानंतर ग्राम महसूल अधिकारी यांना ‘**Verified**' इंडिकेटर ‘**Yes**’ म्हणून दिसेल.
- पडताळणी नुसार जमीनी कमी जास्त करण्याची सुविधा खालील प्रमाणे आहे
  - ग्राम महसूल अधिकारी हे दर्शवलेल्या checkbox ला अनक्लिक करून ती जमीन कमी करू शकतात
  - जमीन जोडण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी यांनी “Fetch Land details” मध्ये जाऊन सर्वे क्रमांक आणी सब सर्वे क्रमांक हे नमूद करावे आणि ‘Show Land Details’ बटन वर क्लिक करावे
  - ग्राम महसूल अधिकारी यांना सर्वे क्रमांकाशी संबंधित सर्व जमीनी दिसतील.
  - ग्राम महसूल अधिकारी यांनी शेतकऱ्याच्या जमिनीची पडताळणी करून जमिनीचा ‘□’ checkbox क्लिक करावा लागेल आणि नंतर ‘Add’ बटनवर क्लिक करावे लागेल
- ‘**Verified**' इंडिकेटर ‘**Yes**’ हा इंडिकेटर प्रत्येक जमीनीसाठी झाला आहे हे तपासून घ्या
- माहीती जतन करण्यासाठी ‘Next’ वर क्लिक करा




मागे

# जर जमिनीची माहीती आपणहून आली नाही


- ग्राम महसूल अधिकारी यांना जर जमिनीची माहीती दिसली नाही तर त्यांनी ‘Fetch land details’ या बटनवर वर क्लिक करावे
- आणी पुढे दिलेल्या स्टेप्स कराव्या




मागे पुढे

# बकेट मधून जमिनीचा तपशील कसे मिळवणार


- ‘Fetch land details’ वर क्लिक केल्यावर ही स्क्रीन दिसेल
- या मध्ये राज्य, जिल्हा, तालुका आणि गाव ही माहीती Automatic दर्शवली जाईल.
- या मध्ये ग्राम महसूल अधिकारी यांनी ‘सर्वे क्रमांक’ प्रविष्ट करावे आणि ड्रॉपडाउन मेनूमधून शेतकऱ्याचे नाव निवडावे.
- ‘Show land Details’ या बटनवर क्लिक करावे




मागे पुढे


# जमीन जोडा

- जर शेतकऱ्याची त्या गावामध्ये एका पेक्षा जास्त जमीनी असतील तर ग्राम महसूल अधिकारी वर दिलेल्या '>' बटनवर क्लिक करून बघू शकतात
- सदर माहीती ही ग्राम महसूल अधिकारी हयांनी त्यांच्या कडील गाव दफ्तरी असणाऱ्या अधिकार अभिलेखा सोबत प्रथम पडताळणी करावी.
- ज्या जमीनी संबंधित शेतकर्यांच्या असूनही बकेट मध्ये त्याच्या नावाने नोंदविलेल्या नाहीत का याची तपासणी करावी
- ज्या जमीनी शेतकऱ्यांच्या नसूनही बकेट मध्ये त्याच्या नावाने नोंदविलेल्या आहेत का याची तपासणी करावी.
- ग्राम महसूल अधिकारी यांना जमिनीच्या माहीती स्क्रीन वर '□' वरील बाजूस डावीकडे दिसेल
- ग्राम महसूल अधिकारी यांनी पडताळणी करून योग्य त्या जमीनीचा Check box क्लिक करावे
- सर्व जमिनींची पडताळणी करून check box क्लिक झाल्यावर शेवटी 'Add' बटनवर क्लिक करावे
- 'Add' बटणावर क्लिक केल्यावर आणि निवडलेली जमीनी मागील स्क्रीनमधील जमिनींच्या यादीत जोडली जाईल
- ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी शेतकऱ्याच्या सर्व शेत जमीनी यादीत जोडल्या आहे हे सुनिश्चित करावे.



# सर्व जमीनींची पडताळणी


- एकदा सर्व जमिनींचा समावेश झाल्यानंतर ‘Verify all lands’ हा पर्याय निवडणे <u>**आवश्यक**</u> आहे.
- त्यानंतर ग्राम महसूल अधिकारी यांना **‘Verified'** इंडिकेटर **‘Yes’** म्हणून दिसेल.
- **‘Verified'** इंडिकेटर **‘Yes’** हा इंडिकेटर प्रत्येक जमीनीसाठी झाला आहे हे तपासून घ्या
- माहीती जतन करण्यासाठी ‘Next’ वर क्लिक करा




मागे

# ज्या शेतकऱ्याच्या समोर बकेट नाहीत किंवा अद्ययावत बकेट नाहीत तर काय करावे

- जमिनीची बकेट तयार केल्या गेल्या नाहीत किंवा अद्ययावत नाहीत तर अश्या वेळेस  ग्राम महसूल अधिकारी यांनी अधिकार अभिलेखाच्या live data मधून जमीन जोडण्यासाठी 'Fetch land details' या बटनवर वर क्लिक करावे




AgriStack MAHARASHTRA

मागे

# अधिकार अभिलेखा मधून जमिनीची माहीती कशी मिळवावी

- अधिकार अभिलेखा मधून जमीन माहीती घेण्यासाठी प्रथम सर्वे क्रमांक ‘00’ टाकावा व “show land details” यावर क्लिक करावे:- स्टेप १ दर्शवली आहे याने सर्व जमिनींचा live database ला access उपलब्ध होईल.
- ग्राम महसूल अधिकारी यांनी सर्वे क्रमांक आणी सब सर्वे क्रमांक हे नमूद करावे आणी ‘Show Land Details’ बटन वर क्लिक करावे :- स्टेप २दर्शवली आहे
- ग्राम महसूल अधिकारी यांना सर्वे क्रमांकाशी संबंधित सर्व जमीनी दिसतील.
- ग्राम महसूल अधिकारी यांनी शेतकऱ्याच्या जमिनीची पडताळणी करून जमिनीचा ‘□’ checkbox क्लिक करावा लागेल आणि नंतर ‘Add’ बटनवर क्लिक करावे लागेल
- जर शेतकऱ्याकडे अनेक जमिनी असतील तर त्याला त्या एक-एक करून जोडाव्या लागतील








मागे

# सर्व जमीनींची पडताळणी

- एकदा सर्व जमिनींचा समावेश झाल्यानंतर ‘Verify all lands’ हा पर्याय निवडणे आवश्यक आहे.
- त्यानंतर ग्राम महसूल अधिकारी यांना ‘Verified' इंडिकेटर ‘Yes’ म्हणून दिसेल.
- पडताळणी नुसार जमीनी कमी जास्त करण्याची सुविधा खालील प्रमाणे आहे
- ग्राम महसूल अधिकारी हे दर्शवलेल्या checkbox ला क्लिक करून ती जमीन कमी करू शकतात
- जमीन जोडण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी यांनी “Fetch Land details” मध्ये जाऊन सर्वे क्रमांक आणि सब सर्वे क्रमांक हे नमूद करावे आणि ‘Show Land Details’ बटन वर क्लिक करावे
- ग्राम महसूल अधिकारी यांना सर्वे क्रमांकाशी संबंधित सर्व जमीनी दिसतील.
- ग्राम महसूल अधिकारी यांनी शेतकऱ्याच्या जमिनीची पडताळणी करून जमिनीचा ‘□’ checkbox क्लिक करावा लागेल आणि नंतर ‘Add’ बटनवर क्लिक करावे लागेल
- ‘Verified' इंडिकेटर ‘Yes’ हा इंडिकेटर प्रत्येक जमीनीसाठी झाला आहे हे तपासून घ्या
- माहीती जतन करण्यासाठी ‘Next’ वर क्लिक करा





मागे


# जोडलेल्या जमीनी कमी करणेसाठी कारण नमूद करणे

- जर शेतकऱ्याची जमीन चुकीची आली असेल अथवा जमीन विकली असेल आणि तो शेतकरी आता त्या जमीनीचा धारक नाही आहे
- अशावेळी ग्राम महसूल अधिकारी हे दर्शवलेल्या checkbox ला अन-क्लिक करून ती जमीन शेतकऱ्याच्या मालकी मधून कमी करू शकतात

# जमीन काढण्यासाठीचे कारणे

- Checkbox वर क्लिक केल्यावर हा पॉप अप दिसेल
- Dropdown मधून २ कारणा पैकी कारण निवडावे आणी ‘yes’ बटनवर क्लिक करून जतन करावे




मागे



# 2

## कृषी सहाय्यक/ ग्राम विकास अधिकारी लॉगिन

# लॉगिन

- मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये लॉगिन स्क्रीनवर कृषी सहाय्यक/ ग्राम विकास अधिकारी यांनी त्यांचे username व Password प्रविष्ट करून प्रवेश करावा.
- आपण आपला पासवर्ड विसरले असल्यास 'Forgot Password' या लिंकचा वापर करून पुन्हा तयार करता येईल.




# कन्सेंट व e-Sign

- कृषी सहाय्यक/ ग्राम विकास अधिकारी यांनी लॉगीन केल्यानंतर 'Farmer consent E-sign' हा पर्याय निवडा



# शेतकऱ्याची आधार जोडणीसाठी सहमती

- कृषी सहाय्यक/ ग्राम विकास अधिकारी यांनी आधार क्रमांक प्रविष्ट करावा.
- या स्क्रीनवर आधार प्रविष्ट करून कृषी सहाय्यक/ ग्राम विकास अधिकारी यांना ज्या शेतकऱ्याची माहीती ग्राम महसूल अधिकारी यांनी भरली आहे त्या शेतकऱ्याची कन्सेंट घेण्यासाठी पुढे जाता येईल





Agri Stack MAHARASHTRA

# कन्सेंट: चेकबॉक्स आणि ई-साइन

- शेतकऱ्याची सहमती असल्यास कृषी सहाय्यक / ग्राम विकास अधिकारी यांनी '□' वर क्लिक करून 'Submit' बटण वर क्लिक करावे.
- दुसऱ्या कन्सेंटसाठी DropDown मधून 'yes' हा पर्याय निवडावा
- कृषी सहाय्यक / ग्राम विकास अधिकारी यांनी शेतकऱ्यास दोनही सहमती बाबत सविस्तर माहिती द्यावी. आवश्यकतेनुसार 'सहमती' वाचून दाखवावी.
- त्यानंतर 'e-Hastakshar' या ॲप वर पुढे जाईल
- तिथे आधार प्रविष्ट करून e-sign करावे
- 'Submit' ह्या बटन वर क्लिक करा.
- या नंतर शेतकऱ्याला काही वेळा नंतर त्याच्या मोबाईल वर Farmer ID तयार झाल्याचा SMS प्राप्त होईल
- Farmer ID तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.




***खातेदाराची आधार जोडणी हि ऐच्छिक आहे तथापि ॲग्रीस्टॅक आधार जोडणी अनिवार्य असुन या सहमती खेरीज शेतकरी ओळख क्रमांक निर्माण होऊ शकणार नाही याची कल्पना शेतकऱ्यास द्यावी.***

# धन्यवाद